# महाराष्ट्र शासन
# वनविभाग
# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), गडचिरोली यांचे कार्यालय

**जाहिरात क्र.कक्ष-१(३)/आस्था/प्र.क्र.९ /१६-१७/२२२४ दि.-२२/०९/२०१६**

## गडचिरोली जिल्हयातील अनुसूचित क्षेत्रातील वनरक्षक पदांची भरती -२०१६

महाराष्ट्र शासन अधिसूचना RB/TC/e-१३०१३(४)/Notification-१/४७४/२०१४ दि.९.६.२०१४ व अधिसूचना क्रमांक RB/TC/e-१३०१३(४)/Notification-२/४७४/२०१४/७३० दि.१४.८.२०१४ अन्वये अनुसूचित क्षेत्रातील **वनरक्षक** हे पद केंद्र शासनाच्या दिनांक २ डिसेंबर १९८५ च्या अधिसूचनेमध्ये (महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक टिएसपी-१०८६/८७१०/प्र.क्र.३१/का-५ दि.९ मार्च,१९९० मधील सुधारणेसह) नमुद जिल्हा,तालुका व गावातील स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारातून भरण्याबाबत शासन आदेश आहेत.

गडचिरोली वनवृत्ताअंतर्गत गडचिरोली जिल्हयातील अनुसूचित क्षेत्रातील **वनरक्षकांची** खाली नमुद केल्याप्रमाणे रिक्त असलेली व रिक्त होणारी पदे पात्रता धारक केवळ गडचिरोली जिल्हयातील अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमातीचे उमेदवारामधून असावा ज्यांचे वाडवडील,पंजोबा-आजोबा हे दिनांक २६.१.१९५० पासून गडचिरोली जिल्हयातील अनुसूचित क्षेत्रामधील गावामधील वास्तव्यास आहे अश्या उमेदवारांकडून विहीत नमुन्यात ऑनलाईन (Online) अर्ज मागविण्यात येत आहेत.

ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सुचना व सविस्तर जाहीरात महाऑनलाईन, मर्यादित **(Mahaonline)** च्या **www.maharecruitment.mahaonline.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने संपुर्ण जाहीरात व अनुषंगिक सुचना काळजीपुर्वक वाचाव्या.

उपरोक्त वनरक्षक संवर्गातील संभाव्य रिक्त पदसंख्या, त्या पदाकरिता विहित केलेली वेतनश्रेणी / शैक्षणिक अर्हता शारीरिक पात्रता / वयोमर्यादा इत्यादिचा तपशिल खालील प्रमाणे आहे. भरतीसाठी दिलेल्या पदसंख्येमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे.

**(नमुद केल्याप्रमाणे महिला आरक्षणाची ११ पदे असून ती एकुण ३२ पदामध्ये समाविष्ट आहेत.)**

**पदांचा तपशील :**

**भरती वर्ष २०१६**

| पदाचे नांव | एकुण पदांची संख्या | १/३ महिला आरक्षण पदांची संख्या |
|---|---|---|
| वनरक्षक | ३२ | ११ |

१. **वेतनश्रेणी :-** (रु.५२०० - रु.२०२००, ग्रेड पे - रु.१८००)

२. **शैक्षणिक पात्रता :** उमेदवार हा **माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा** उत्तीर्ण असावा.(इयत्ता १० वी)

**शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.एसएससी-२००५/(१४९/०५)/उमाशि-२, दि.२०/६/२००५ अन्वये इ. १० वी, ११ वी व १२ वी च्या परिक्षेशी समकक्ष परिक्षांची यादी प्रसिध्द करण्यात आलेली असून, सदर शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे पत्र क्र.एसएससी-२०१०/(६६/१०)/उमाशि-२, दि.२९/४/२०१० अन्वये सदर शासन निर्णयाचा विभागांना / कार्यालयांना वेळोवेळी उपयोग व्हावा या करीता तो महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्यांचा संगणक संकेतांक क्रमांक २०१००४२९१७०९४६००१ असा आहे.**

३ **वयोमर्यादा :-** उमेदवाराचे वय **दि.२६ सप्टेंबर,२०१६** रोजी किमान १८ वर्षापेक्षा कमी व कमाल २५+५ = ३० वर्षापेक्षा जास्त नसावे.

३.१ **उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम.**
महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत ५ वर्षापर्यंत.

३.२ **वनरक्षक पदासाठी शारीरिक पात्रता.**

| **शारीरीक माप** | **उमेदवाराचा प्रवर्ग** | |
|---|---|---|
| | **पुरुष** | **स्त्री** |
| **अनुसूचित जमाती मधील उमेदवारासाठी खालील प्रमाणे शिथिलक्षम** | | |
| उंची (से.मी. मध्ये) | १५२.५ | १४५ |
| छातीचा घेर --<br>न फुगवता (से.मी. मध्ये )<br>फुगवून (से.मी. मध्ये) | <br>७९<br>८४ | <br>--<br>-- |
| वजन (कि.ग्र.मध्ये) | वैद्यकीय मापानुसार उंची ही वयाच्या योग्य प्रमाणात असावी | वैद्यकीय मापानुसार उंची ही वयाच्या योग्य प्रमाणात असावी |

(चार) दूर दृष्टी आणि जवळील दृष्टीचे चष्मे व विना चष्म्याचे खालील मानक करणे आवश्यक आहे.

**<u>दूरदृष्टी</u>**

| अधिक चांगला डोळा | वाईट डोळा (सुधारलेली दृष्टी) |
|---|---|
| ६/६ | ६/१२ |
| किंवा | किंवा |
| ६/९ | ६/९ |

**<u>जवळील दृष्टी</u>**

| अधिक चांगला डोळा | वाईट डोळा |
|---|---|
| J.१ | J.११ |

प्रत्येक डोळा संपूर्ण क्षेत्र दृष्टीयुक्त असणे आवश्यक आहे.

(ब) शासकीय वैद्यकीय अधिकारी किंवा वैद्यकीय तपासणी संदर्भात प्राधिकृत केलेल्या वैद्यकीय विशेषज्ञांकडून वैद्यकीय पात्रता प्रमाणित करण्यात येईल. वैद्यकीय चाचणीमध्ये तिरळेपणा, रंग व रात आंधळेपणा, आतल्या बाजूला फेंगाडे असलेले गुडघे, सपाट पाय, त्वचा व छातीचे रोग या संबंधीचा आणि अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), म.रा.नागपुर यांनी वेळोवेळी विहित केलेल्या अन्य वैद्यकीय चाचणीचा समावेश राहील.

## ४. निवड पध्दत :-

४.१ **उमेदवार गडचिरोली जिल्हयातील अनुसूचित क्षेत्रात दिनांक २६.१.१९५० पासून उमेदवाराचे पंजोबा,आजोबा,वडील (कुटुंबाचे) वास्तव्य असावे. ज्या उमेदवाराचे कुटुंबाचे वास्तव्य वर नमुद दिनांकानंतरचे असेल त्यांचा अर्ज पात्र ठरणार नाही. उमेदवाराने दिनांक २६.१.१९५० पासून गडचिरोली जिल्हयातील अनुसूचित क्षेत्रातील वास्तव्याचा पुरावा सादर करणे बंधनकारक आहे. सदर पुरावा सादर करतांना महसुली अभिलेख (पी-१,पी-३,पी-९ तसेच नातेसंबध स्पष्ट होणारी वंशावळ), तसेच वास्तव्य सिध्द होणारे इतर आवश्यक पुरावे सादर करणे आवश्यक आहे. दिनांक २६.१.१९५० पासून वास्तव्य असल्याचा उमेदवाराने पुरावा सादर न केल्यास किंवा वास्तव्य सिध्द न झाल्यास उमेदवार अपात्र ठरेल.**

४.२ वनरक्षक पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवार किमान शारीरीक पात्रता धारण करतात किंवा कसे हे निश्चित करण्याच्या दृष्टीने उमेदवारांची मोजमापे स्थानिक शासकीय वैद्यकिय अधिकारी यांच्या उपस्थितीत घेण्यात येतील.

४.३ जे उमेदवार धावण्याची चाळणी चाचणी विहीत वेळेत पुर्ण करतील त्यामधुन स्पर्धात्मक वेळेनुसार किमान शैक्षणिक पात्रता,वयोमर्यादेची अट तसेच किमान शारीरिक पात्रता धारण करतात त्या पात्र उमेदवारांची खालीलप्रमाणे शारीरिक पात्रता मोजणीकरिता निवड करण्यात येईल.

बहुतांश वनक्षेत्र हे भौगोलीक दृष्टया दुर्गम क्षेत्रात अस्तित्वात आहे. वनरक्षक हे वनविभागातील क्षेत्रीय स्तरावरील आघाडीवरील पद **(Frontline Staff)** असून वनरक्षकाने वनसंरक्षणाच्या दृष्टिने वनक्षेत्रात पायी फिरुन गस्त घालणे आवश्यक असते.त्यामुळे वनरक्षक या पदासाठी पुरुष उमेदवारांना ४ तासांत २५ कि.मी.चालणे व महिला उमेदवारांना ४ तासांत १६ कि.मी.चालणे अशी शारिरीक क्षमता चाचणी विहित करण्यात येत आहे.

**त्यामुळे शारीरीकदृष्टया सक्षम उमेदवारांची प्राधान्याने निवड करण्याच्या दृष्टीने विहित केलेले शारीरीक मोजमाप व धावण्यांची चाळणी चाचणी घेण्यांत येईल. यासाठी शारीरिक दृष्टया सुदृढ असल्याबाबत शासकिय वैद्यकिय अधिका-यांकडून प्रपत्रात प्रमाणपत्र प्राप्त करावे. त्याशिवाय शारिरिक तपासणी करीता संधी दिली जाणार नाही. सदरचे ओळखपत्र महाऑनलाईन, मर्यादीत च्या www.maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावरुन दोन प्रतीत डाऊनलोड करावे व एक प्रत शारिरिक मोजमाप तपासणीचे वेळेस सादर करावी.**

**परिच्छेद ३.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शारिरिक मोजमापानुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची शारीरीक क्षमता चाळणी चाचणी घेण्यात येईल. त्यानंतर पात्र उमेदवारांना धावण्यांची चाळणी चाचणी पुरुष उमेदवारांनी ५ कि.मी. व महिला उमेदवारांनी ३ कि.मी. जास्तीत जास्त ३० मिनीटामध्ये पूर्ण करणे आवश्यक राहील. ही चाळणी चाचणी स्पर्धात्मक स्वरुपाची व बाद पध्दतीची असेल. यामध्ये प्रथम येणारे पदसंख्येच्या ३ पट एवढे उमेदवार पुढील फेरीसाठी पात्र ठरविण्यात येतील. ३ पटीपेक्षा जास्त उमेदवार पुढील फेरीसाठी निवड करण्याचे अधिकार निवड समितीकडे राहतील. उमेदवारांची संख्या निश्चित करतांना विहित करण्यात आलेले आरक्षणही विचारात घेण्यात येईल.**

४.४ वरील प्रमाणे पुढील फेरीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचे इयत्ता १० वी मधील (माध्यमिक शालांत परिक्षा) एकूण गुण विचारात घेवून गुणानुक्रम निश्चित करण्यात येईल. इयत्ता १० वी मधील गुणांना ८७.५ % एवढे भारांकन **(Weightage)** देण्यात येईल.

(टीप :- १० वी परिक्षेत एकापेक्षा जास्त संधीत उत्तीर्ण झाले असेल तर त्या प्रत्येक परीक्षेचे गुणपत्रक (मार्कलिस्ट) निवड चाचणीच्या वेळी समक्ष आणणे आवश्यक आहे अशी सर्व गुणपत्रके न आणल्यास असा उमेदवार अपात्र समजला जाईल.)

**<u>गुणवत्ता यादी खालील पध्दतीने तयार करण्यात येईल.</u>**

४.५ गुणवत्ता यादी तयार करतांना इयत्ता १० वी मधील (माध्यमिक शालांत परिक्षा) गुणांच्या टक्केवारीचे ८७.५% भारांकन देण्यात येईल.

४.६ धावण्याच्या चाचणी परीक्षेमध्ये १२.५% भारांकन देण्यात येईल. धावण्याच्या चाचणी परिक्षेकरिता खालीलप्रमाणे गुण देण्यात येतील.

| | | | |
|---|---|---|---|
| १.पहिल्या येणा-या ३ उमेदवारास (अ.क्र.१ ते ३) | प्रत्येकी - | १० | गुण |
| २.त्यानंतर येणा-या ५ उमेदवारास (अ.क्र.४ ते ८) | प्रत्येकी - | ८ | गुण |
| ३.त्यानंतर येणा-या ७ उमेदवारास (अ.क्र.९ ते १५) | प्रत्येकी - | ६ | गुण |
| ४.त्यानंतर येणा-या १०उमेदवारास (अ.क्र.१६ते २५) | प्रत्येकी - | ४ | गुण |
| ५.त्यानंतर येणा-या १५उमेदवारास (अ.क्र.२६ते४०) | प्रत्येकी - | २.५ | गुण |
| ६.४० व्या क्रमांकानंतर येणा-या उमेदवारास - | प्रत्येकी | ० | गुण |

४.७ वरीलप्रमाणे इयत्ता १० वी शैक्षणिक अर्हता परिक्षेमधील प्राप्त गुणांच्या टक्केवारीचे ८७.५% केलेले भारांकन व १२.५% भारांकन करीता धावण्याच्या चाचणी परिक्षेमध्ये प्राप्त केलेले गुण यांची बेरीज करुन उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल. त्या आधारे आरक्षणनिहाय असलेली रिक्त पदे विचारात घेवून अंतीम निवड यादी तयार करण्यात येईल.

**उदाहरणार्थ** :- श्री."क"या उमेदवाराने शैक्षणिक अर्हता परिक्षा (माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा) मध्ये एकुण निर्धारित ५०० गुणांपैकी ३०० गुण प्राप्त केले आहेत त्याची टक्केवारी ६०% येईल, त्यांचे ८७.५% भारांकन म्हणजे ५२.५० ऐवढे येईल. तसेच ५ कि.मी./३ कि.मी. धावण्याच्या चाचणी परिक्षेत समजा तो ७ व्या क्रमांकावर आलेला आहे, तर उर्वरित १२.५% भारांकन करिता त्यांना दिनांक २१.७.२०१४ च्या शासन पत्रानुसार १२.५ पैकी ८ गुण मिळतील. या प्रमाणे गुणवत्ता यादीकरिता त्यांना मिळणारे गुण = ५२.५०+८= ६०.५०% अशा प्रकारे गणना केली जाईल.

४.८ गुणवत्ताधारक उमेदवाराची निवडसुची तयार करणेपूर्वी शासन निर्णय क्रमांक एफएसटी-०७/११/प्र.क्र.२८७/फ-४, दि.३० जुलै, २०११ अन्वये २५ कि.मी.पुरुष उमेदवारांसाठी तर १६ कि.मी. स्त्री उमेदवारांसाठी चालण्याची शारिरिक क्षमता चाचणी घेण्यात येईल. उपरोक्त चाचणी ही चार तासांमध्ये पुर्ण करणे बंधनकारक राहील.

## निवड प्रक्रियेचे वेळापत्रक

| अ.क्र. | टप्पा | दिनांक |
|---|---|---|
| १ | विविध माध्यमातुन प्रसिध्दी देऊन ऑनलाईन अर्ज मागविणे. वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्याची अंतिम तारीख. | दिनांक २६/०९/२०१६ |
| २ | ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख. | दिनांक १७/१०/२०१६ |
| ३ | प्राप्त ऑनलाईन अर्जानुसार उमदेवारांची शारिरिक पात्रता तपासणीचा कार्यक्रम व पुरुष उमेदवाराकरिता ५ कि.मी./महिला उमेदवाराकरिता ३ कि.मी. धावण्याची चाळणी चाचणीचा कार्यक्रम प्रसिध्द करणे. | दिनांक २०/१०/२०१६ |
| ४ | उमेदवारांची शारिरिक पात्रता तपासणे,(उंची,छातीचे माप व वजन) | दिनांक २२/१०/२०१६ ते दिनांक २४/१०/२०१६ |
| ५ | शारिरिक अर्हतामध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची ५ कि.मी./३ कि.मी. धावण्याची चाळणी चाचणी घेणे. | |
| ६ | ५ कि.मी./३ कि.मी. धावण्याची चाळणी चाचणी मध्ये नियमानुसार १:३ प्रमाणात पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी तसेच प्रमाणपत्र तपासणी कार्यक्रम प्रसिध्द करणे. | दिनांक ०२/११/२०१६ |
| ७ | धावण्याची चाळणी चाचणी मध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची शैक्षणिक व इतर अर्हता बाबत प्रमाणपत्र तपासणी करणे. | दिनांक ०९/११/२०१६ ते दिनांक ११/११/२०१६ |
| ८ | उमेदवारांची शैक्षणिक अर्हता परिक्षेमध्ये प्राप्त गुणांचे ८७.५% भारांकन + शासन पत्र दिनांक २१/७/२०१४ अन्वये ५ कि.मी./३ कि.मी. धावण्याच्या चाचणी मध्ये मिळालेल्या गुणांची बेरीज करुन निवड यादी तयार करुन शारिरिक क्षमता चाचणी करिता कार्यक्रम प्रसिध्द करणे. | दिनांक १८/११/२०१६ |
| ९ | निवड झालेल्या पुरुष उमेदवारांची चार तासात २५ कि.मी. चालणे व महिला उमेदवाराची चार तासात १६ कि.मी. चालणेची शारिरिक क्षमता चाचणी घेणे. | दिनांक २०/११/२०१६ |
| १० | चार तासात पुरुष उमेदवार २५ कि.मी./महिला उमेदवार १६ कि.मी. अंतर पुर्ण करण्याच्या शारिरिक क्षमता चाचणीमध्ये पात्र ठरलेल्या निवड यादीतील उमेदवारास<br>i) वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र सादर करण्यास कळविणे.<br>ii) सक्षम वैद्यकीय अधिकारी यांचेकडून वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र प्राप्त करणे. | दिनांक २१/११/२०१६<br>दिनांक ३०/११/२०१६ |
| ११ | वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम अधिकारी यानी जारी केलेले जात वैधता प्रमाणपत्र असलेल्या उमेदवारांना सक्षम प्राधिकारी यांनी वनरक्षक पदावरील नियुक्तीचे आदेश देणे. | दिनांक ०१/१२/२०१६ |

(i) शारीरीक पात्रता तपासणीचे स्थळ आणि वेळ.
(ii) शारीरीक क्षमता चाचणीचे स्थळ आणि वेळ.
(iii)धावण्याच्या चाचणीचे स्थळ आणि वेळ.
(iv) प्रसिध्द वेळापत्रकात काही बदल झाल्यास त्याची सूचना
**www.maharecruitment .mahaonline.gov.in** या संकेतस्थळावर देणेत येईल.

तसेच उपवनसंरक्षक, गडचिरोली वनविभाग/उपवनसंरक्षक,वडसा वनविभाग/उपवनसंरक्षक,आलापल्ली वनविभाग/उपवनसंरक्षक,सिरोंचा वनविभाग/उपवनसंरक्षक,भामरागड वनविभाग यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येईल.

(टिप :- **भरती प्रक्रीयेसंबधातील माहिती www.maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द केली जाईल. याबाबत वेगळ्याने पत्रव्यवहार केला जाणार नाही.**)

## ५. सर्वसाधारण अटी :-

५.१. सेवाप्रवेश नियमातील अटीनुसार संबंधित संवर्गातील उमेदवारांना मराठी भाषा वाचता, लिहिता व बोलता येणे आवश्यक आहे.

५.२ सदर भरती गडचिरोली जिल्हयातील अनुसूचित क्षेत्रातील वनरक्षक पदांची आहे. त्यामुळे उमेदवार गडचिरोली जिल्हयातील अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमातीचा असावा.

५.३ पडताळणी अंती अर्ज रद्द ठरविणे, निवड प्रक्रियेत वेळेवर बदल करणे, उमेदवारांची अंतिम निवड करणे, जाहिरातीचे अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करणे या बाबतचे संपुर्ण अधिकार निवड समितीने राखुन ठेवले आहे.

५.४ सेवाशर्तीनुसार अपात्र ठरलेल्या उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वगळण्यात येईल.

५.५ उमेदवारांना शारिरीक क्षमता चाचणी परिक्षा करिता कोणत्याही प्रकारचा भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

५.७ उमेदवारांना ओळखपत्र, लहान कुटूंबासंबंधी प्रमाणपत्र (नमूना-अ), वचनपत्राचा नमूना व उमेदवारांनी स्वाक्षरी करावयाचे प्रतिज्ञापत्राचे नमूने **www.maharecruitment.mahaonline.gov.in** या संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घ्यावे.

## ६. निवडसूचीची कालमर्यादा :

निवडसमितीने तयार केलेली निवडसुची १ वर्षापर्यत विधिग्राहय राहील. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल. निवड समितीने तयार केलेल्या निवडसूचीमधून गुणवत्ता यादीनूसार उमेदवाराची नियुक्तीसाठी शिफारस केल्यानंतर शिफारस केलेला उमेदवार सदर पदावर हजर न झाल्यास किंवा संबधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार किवा जाती प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र किंवा दि.२६.१.१९५० पासून अनुसूचित क्षेत्रातील वास्तव्याचा समुचित पुरावा सादर न केल्यास किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव संबधित उमेदवार पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास निवडसुचीतील अतिरीक्त उमेदवारांमधून अन्य उमेदवाराची नियुक्ती करण्यात येईल.

## ७. परिक्षा शुल्क :-

उमेदवाराने उपरोक्त पदासाठी आवश्यक असलेले शुल्क खालीलप्रमाणे महाआॅनलाईन, मर्यादीत च्या **www.maharecruitment.mahaonline.gov.in** या संकेतस्थळावर मार्गदर्शक सुचनेमध्ये दिलेल्या पध्दतीने किंवा जवळच्या भारतीय स्टेट बॅक शाखेमध्ये भरणा करावी.

| प्रवर्ग | शुल्क |
|---|---|
| अनुसूचित जमाती प्रवर्गाकरिता | रु.१५० |

## ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सुचना

| अ.क्र. | कार्यक्रम | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यत |
| १ | अर्ज ऑनलाईन नोंद (रजीस्ट्रेशन) करण्याचा कालावधी | २६.९.२०१६ | १७.१०.२०१६ |

## ८. अर्ज करण्याची पध्दत :-

१) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याबाबत सविस्तर सुचना महाऑनलाईन, मर्यादित (mahaonline) च्या www.maharecruitment.mahaonline. gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२) उमेदवाराने उपरोक्त नमुद केलेल्या संकेतस्थळावर (website) Apply mahaonline या लिंकवर क्लिक करावे व सर्वप्रथम प्राथमिक माहिती भरावी यानंतर रजिस्टर (button) या बटनावर क्लिक करावे.

३) नोंदणी झाल्यानंतर उमेदवाराने अर्ज क्रमांक (Application form No.) व पासवर्ड (Password) काळजीपुर्वक स्वत:कडे पुढील प्रक्रियेसाठी जपुन ठेवावा.

४) त्यानंतर नोंदणी झाल्यानंतर उमेदवाराने प्रिंट चलन (print challan) या बटनावर क्लिक करुन प्रिंट करावे.

५) बँक चलनावर नमूद केलेली फि स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) यांच्या शाखेमध्ये जाहिरातीत दिलेल्या या मुदतीचे आत कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक राहील व त्याची एक प्रत स्वत:कडे जपून ठेवावी फि भरण्यासाठी बॅन्केने आकारलेले शुल्क उमेदवाराने बॅन्केत भरावे.

६) बँकेत चलानद्वारे फी भरल्यानंतर उमेदवाराने चलानवर असलेला Transaction ID क्रमांक www.maharecruitment.mahaonline.gov. in संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे. त्याशिवाय अर्ज स्विकृत होणार नाही.

७) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वत:चा अद्यावत (Latest) फोटो व स्वत:ची स्वाक्षरी विहित पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.

८) उमेदवाराने संपुर्ण अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर अर्जाची प्रिंट दोन प्रतीत काढून ती स्वत:जवळ ठेवावी व त्यापैकी एक प्रत शारिरिक तपासणीचे वेळेस ओळखपत्रासह सादर करावी.

९) वरील सर्व (उमेदवार नोंदणी, बँक प्रक्रिया, उर्वरित अर्ज भरणे इत्यादि) प्रक्रिया पुर्ण केल्यानंतर उमेदवार पुढील प्रक्रियेसाठी पात्र होईल.)

१०) नक्षलग्रस्त क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी वनरक्षक पदासाठी १० वी परिक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य असल्याने, ऑनलाईन अर्ज भरतांना १० वीच्या परिक्षेचा संपुर्ण तपशिल भरणे आवश्यक आहे.

**११) उमेदवाराच्या माहिती व मदतीकरीता महाऑनलाईन चे हेल्पलाईन क्रमांक ०२२-६१३१६४०३ व ईमेल क्रमांक support@mahaonline.gov.in वर उमेदवारांना योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध होईल.**

## ९. भरतीबाबत अर्जदारासाठी महत्वाच्या सुचना

१) पोस्टाने अथवा इतर कोणत्याही प्रकारे आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. ऑनलाईन अर्जाची प्रत या कार्यालयास समक्ष अथवा पोष्टाने अथवा या कार्यालयाचे वेबसाईटवर पाठवू नये.

२) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी स्वत:चा मोबाईल नंबर व ई-मेल आय-डी नोंद करतेवेळी काळजीपूर्वक भरावा.

३) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक प्रमाणपत्रे व अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही तथापी ऑनलाईन अर्जामध्ये संपुर्ण माहिती भरणे आवश्यक आहे ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही त्रुटी राहील्यास अर्ज संगणकाद्वारे स्विकारला जाणार नाही त्यामुळे उमेदवाराने अर्ज परिपूर्ण भरण्याची दक्षता घ्यावी. अंतिम निवडपुर्व कागदपत्र तपासण्याची वेळी सदर कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील.

४) गुणानुक्रमे पात्र झालेल्या उमेदवारांची नावे महाऑनलाईन, मर्यादीत च्या **www.maharecruitment.mahaonline. gov. in** या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येतील.

५) वनरक्षक पदासाठी धावण्याची चाळणी चाचणी ही उमेदवारांची कोणतीही कागदपत्रे तपासणी न करता घेतली जाणार असल्याने या परिक्षेत मिळालेल्या गुणांचे आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाही. कागदपत्रांच्या पुर्ण छाननीनंतर तसेच शारीरिक पात्रतेच्या पुर्ततेच्या अधीन उमेदवारांची गुणवत्तेच्या आधारे अंतिम निवड केली जाईल.

६) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र या कार्यालयात नावनोंदणी केली असली तरी वरील पदांसाठी विहित नमुन्यात स्वतंत्रपणे रितसर ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक राहील.

७) अर्ज एकदा ऑनलाईन सादर केल्यानंतर त्यात कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. त्यासाठी अर्ज करतेवेळी उमेदवारांनी आवश्यक सर्व तपशिल स्वत:जवळ तयार ठेवावा व अर्ज योग्य पध्दतीने भरला आहे याची खात्री करावी.

८) निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्पावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना लेखी सूचना दिली जाणार नाही.

९) निवड होऊन नियुक्ती मिळालेल्या उमेदवारांना नियमानुसार प्रशिक्षण, विहित केलेल्या भाषेची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

१०) वनरक्षक पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांनी एका वर्षाचा वनरक्षक अभिक्रम प्रशिक्षण पाठयक्रम यशस्वीरित्या पुर्ण करणे बंधनकारक राहील.

११) उमेदवारांनी त्यांच्या उमेदवारीच्या संबंधात कोणत्याही प्रकारचा वशीला किंवा दबाव आणण्याचा किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविली जाईल.

१२) पदभरती प्रक्रियेच्या वेळी उमेदवारास कोणतीही शारीरिकदृष्टया इजा पोहचल्यास अथवा नुकसान झाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

१३) वनरक्षक पदावर नियुक्ती केलेल्या उमेदवारांना अनुसूचित क्षेत्रातच काम करावे लागेल. त्यांची आंतरवृत्तीय बदली होणार नाही याची नोंद संबंधित उमेदवारांनी घ्यावी.

**१४) उमेदवारांनी नजीकचे कालावधीतील सक्षम अधिकारी यांनी दिलेले जात प्रमाणपत्र तसेच जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. शैक्षणिक प्रमाणपत्र व आवश्यक कागदपत्रे तपासणीचे वेळी जे उमेदवार जात वैधता प्रमाणपत्र सादर करणार नाहीत, त्यांनी ३ महिन्याचे आंत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय अशा उमेदवारांना वनरक्षक पदावर नियुक्तीचे आदेश दिल्या जाणार नाही. तसेच ३ महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचे अटीवर ज्यांची निवड झालेली आहे, अशा उमेदवारांनी वरीलप्रमाणे ३ महिन्याचे मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास वनरक्षक पदावर झालेल्या निवडीवर त्यांचा कोणताही हक्क राहणार नाही व त्यांना अंतीम निवड यादीतून वगळण्यात येईल याची नोंद घ्यावी. त्यामुळे अर्ज करण्यास इच्छुक उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करण्याची तातडीने कार्यवाही करावी.**

१५) अर्जात चुकीच्या किंवा अपूर्ण नोंदी असल्यास व योग्य पात्रता धारक नसल्याचे आढळून आल्यास असा अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१६) महिला उमेदवारांचे लग्नानंतर नावांत बदल असल्यास तशी राजपत्राची प्रत सादर करावी लागेल.

१७) शासकीय नोकर भरतीला लागु असणारे सर्व नियम या भरतीला लागु राहतील.

**१८) सदर वनरक्षक पदाची भरती ही गडचिरोली जिल्हयातील अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवाराकरिता आहे. जाहिरातीसोबत केंद्र शासनानी दिनांक २ डिसेंबर १९८५ नुसार प्रसिध्द केलेल्या अधिसुचनेतील** (महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक टिएसपी-१०८६/८७१०/प्र.क्र.३१/का-५ दि.९ मार्च,१९९० मधील सुधारणेसह) **तालुका/गावाची नांवे सोबतचे *जोडपत्र-एक* मध्ये नमुद केल्याप्रमाणे आहेत. सदर घोषीत अनुसूचित क्षेत्राची यादी ही गडचिरोली जिल्हयामध्ये पुर्वी कार्यान्वित असलेल्या ८ तालुक्याचे अनुषंगाने आहे. तथापि, त्यानंतर नव्याने निर्माण झालेल्या देसाईगंज,कोरची,मुलचेरा व भामरागड तालुक्याचा यात समावेश आहे. तरी उमेदवारांनी आपले गांव अनुसूचीत क्षेत्रात मोडते या बाबीची पुर्णत: खात्री करुनच तसेच गडचिरोली जिल्हयातील अनुसूचित क्षेत्रात दिनांक २६.१.१९५० पासून वास्तव्य असल्याची खात्री करुनच अर्ज करावा.**

१९) उमेदवाराने जाहिरातीतील पदासाठी विहित अर्हता धारण केली म्हणजे त्यास नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवार विहित अर्हता धारण करीत नाही असे आढळल्यास/गैरवर्तन करतांना आढळल्यास/दबावतंत्राचा वापर करतांना आढळल्यास त्याची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रदद होईल.

२०) जाहीरातीमध्ये नमुद पदांच्या संख्येत कमी/जास्त बदल होण्याची शक्यता असल्याने त्याबाबत अर्जदारास कोणताही दावा करता येणार नाही, निवड करण्याची प्रक्रीया,पदांची संख्या याबाबत बदल करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे, टप्पानिहाय घोषित केलेल्या कार्यक्रमामध्ये बदल करणे तसेच संपुर्ण भरती प्रक्रिया रद्द करणे याबाबतचे अधिकार अध्यक्ष,प्रादेशिक निवड समिती तथा मुख्य वनसंरक्षक गडचिरोली (प्रादेशिक) यांनी राखुन ठेवले आहे.

२१) सदरची पदे ही केवळ स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधूनच भरावयाची असल्याने त्या व्यतिरीक्त इतर अन्य कोणत्याही उमेदवाराने अर्ज केल्यास तो विचारात घेतला जाणार नाही.

२२) समान गुण प्राप्त केलेल्या उमेदवारामधील अंतर्गत गुणवत्ता बाबत मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) गडचिरोली यांचे अध्यक्षतेखालील समितीचे निर्णयानुसार गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

२३) भरती प्रक्रीयेच्या प्रत्येक टप्प्यावर उमेदवाराने ओळखपत्र,ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.

२४) उमेदवाराने सादर केलेली माहिती तसेच कोणतेही प्रमाणपत्र किंवा कागदपत्रे खोटे व चुकीचे असल्याचे आढळून आल्यास, अशा उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल व निवड /नियुक्ती रद्द केली जाईल.

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) गडचिरोली यांचेकडे निवड प्रक्रीयेबाबत अटी/शर्ती/सूचना मध्ये बदल/सुधारणा किंवा रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवण्यात आले आहेत.

गडचिरोली, दिनांक २६.९.२०१६

अध्यक्ष,
प्रादेशिक निवड समिती तथा
मुख्य वनसंरक्षक, (प्रादेशिक) गडचिरोली

## मुख्य वनसंरक्षक, गडचिरोली (प्रादेशिक)

## वनरक्षक भरती प्रक्रिया २०१६

### ओळखपत्र

१. उमेदवार क्रमांक (I.D. No.) --------------------------

२. उमेदवाराचे संपूर्ण नांव --------------------------------

--------------------------------

३. पदाचे नांव : **वनरक्षक**

अर्जावर चिकटवलेले छायाचित्र

उमेदवारांची सही

**प्रथम स्पर्धात्मक चाळणी चाचणीपुर्वी उमेदवार हे धावण्यासाठी शारिरीकदृष्टया सुदृढ असल्याबाबतचे वैद्यकिय प्रमाणपत्र.**

प्रमाणित करण्यात येते की, श्री / कु. ...................................................... हे पुरुषाकरीता ५ कि.मी. / स्त्रि उमेदवारांकरीता ३ कि.मी. धावण्यासाठी शारिरीकदृष्टया सुदृढ आहेत.

दिनांक :-

**शासकिय वैद्यकिय अधिकारी**

**(स्वाक्षरी शिक्क्यासह)**

**१. उमेदवारांनी शारीरीक पात्रता तपासणी व मुलाखतीच्या वेळी उपरोक्त नमुन्यातील ओळखपत्र व ऑनलाईन अर्जाची प्रत सोबत आणावी. सदरचे ओळखपत्र सर्व भरती प्रक्रियेसाठी आवश्यक राहील.**

**२. उमेदवारांनी ५ कि.मी. धावण्याच्या चाचणीपुर्वी वरीलप्रमाणे शासकीय वैद्यकीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करावे**

# वनरक्षक पदभरती - २०१६

## लहान कुटूंबा संबंधी प्रतिज्ञापत्र

## नमूना - अ

## (नियम - ४)

मी श्री / श्रीमती / कुमारी ------------------------------------------------------------------------------------श्री ----------------------------------------------------------------------- यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय ----------वर्ष, राहणार ------------------------------------------------------------------------------------ याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

१) मी --------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२) आज रोजी मला ______________ (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८-३-२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ____________ आहे. (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असतील तर दिनांक. २८-३-२००५ वा तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे ---------------------- या पदासाठी मी अपात्र ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

दिनांक :- **अर्जदाराची स्वाक्षरी**

स्थळ :- **नांव:-**

टिप - सदरचे प्रपत्र दस्तऐवज तपासणी वेळेस सोबत घेऊन यावे

## वनरक्षक पदभरती - २०१६

## उमेदवाराचे स्वाक्षरीत करावयाचे प्रतिज्ञापत्र

प्रमाणित करतो / करते की वर नमूद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे सत्य आणि बरोबर आहे. नमूद केलेल्या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता माझ्याकडे आहे याची खात्री करुनच हा अर्ज मी सादर करीत आहे.

मी आणखी असेही प्रमाणीत करतो/करते की अर्जात दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास या माहितीच्या आधारे मिळालेली नोकरी गमावण्यास मी बाध्य राहील व त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

दिनांक : **अर्जदाराची सही**

ठिकाण : **नांवः-**

# <u>वनरक्षक पदभरती - २०१६</u>

## <u>उमेदवाराने द्यावयाचे वचनपत्र</u>

वनरक्षक पदभरती २०१५ मध्ये मी खालील सही करणार वचनपत्र लिहून देतो / देते की, वनरक्षक पदभरती २०१५ मध्ये मी उमेदवार म्हणून आवेदनपत्र दाखल केले आहे. उपरोक्त भरती प्रक्रियेचा भाग म्हणून शारिरीक क्षमता चाळणी चाचणीमध्ये ............... कि.मी. (पुरूष उमेदवारास) .................. तासात / ................. कि.मी. (स्त्री उमेदवारास) ........... तासात पुर्ण करण्याच्या चाळणी चाचणीमध्ये स्वेच्छेने सहभागी होत आहे. सदरहू चाळणी चाचणीकरीता मी शारिरीक दृष्ट्या सक्षम आहे. उपरोक्त शारिरीक क्षमता चाळणी चाचणी दरम्यान माझी शारिरीक वा कोणत्याही प्रकारची हानी झाल्यास, त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

करिता हे वचनपत्र लिहून देण्यात येत आहे.

स्थळ :

**उमेदवाराचे नांव**

ठिकाण :

दिनांक :

टिप - ५ कि.मी. धावणे चाचणी वेळेस समक्ष घ्यावयाचे प्रपत्र.

*आदिवासी उपयोजना क्षेत्र-*
*महाराष्ट्र राज्य*

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
*शासन निर्णय क्रमांक :- टिएसपी-१०८६/८४७०/प्र.क्र.३१/का-५*
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.

दिनांक :- ९ मार्च, १९९०

वाचा :- (१) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग क्र.टिएसक्यूपी- १०७६ /५१९९/१५, दिनांक ४ मार्च, १९७६.
(२) शासन शुध्दिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग क्र.टिएसक्यूपी-१०७६/५१९९/१५, दिनांक १३ ऑगस्ट, १९७६.
(३) शासन शुध्दिपत्रक समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग क्र.टिएसक्यूपी-१०७९/६३/का-१४(१), दिनांक २९ नोव्हेंबर, १९८२.
(४) शासन शुध्दिपत्रक, आदिवासी विकास विभाग क्र. टिएसपी-२०८४/३१८०/ सीआर-१६५/का-६, दिनांक १२ जुलै, १९८४.
(५) शासन परिपत्रक, आदिवासी विकास विभाग क्र. टिएसपी-१०८६/ ४३८५६/ कें.नं. १०१/का-५, दिनांक ५ फेब्रुवारी, १९८५.
(६) संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे पत्र क्रमांक आसंप्र/एझेडविका/का-७/आ.उ.यो./५३६६/मार्च-८८, दिनांक १६ मार्च, १९८८.

शासन निर्णय :-वर नमूद केलेला शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, टिएसक्यूपी-१०७६/५१९९/१५, दिनांक ४ मार्च, १९७६ व त्यानंतर वेळोवेळी काढलेल्या आदेशानुसार महाराष्ट्रातील आदिवासी उपयोजना क्षेत्र जाहीर करण्यात आलेले होते. त्यानुसार महाराष्ट्रातील खालीलप्रमाणे १३ जिल्ह्यांतील ४८ तालुक्यातील एकूण ६,७४० गावांचा समावेश आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये करण्यात आला होता. त्यामध्ये केंद्र शासनाने मंजूर केलेल्या मुख्य आदिवासी उपयोजना क्षेत्रातील ५२२२ गावांचा व १४ शहरांचा व राज्य शासनाने मंजूर केलेल्या अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील १४९८ गावांचा समावेश करण्यात आला होता. हे आदिवासी उपयोजना क्षेत्र सन १९७१ च्या जनगणनेमध्ये समाविष्ट केलेल्या गावांवर आधारीत होते.

२. भारतीय घटनेच्या सन १९७६ च्या बदललेल्या कायद्याप्रमाणे घटनेच्या पाचव्या अनुसूचिमध्ये बदल करण्यात आला आहे. या पाचव्या अनुसूचितील (परिच्छेद ६ उपपरिच्छेद (२) (ii) मध्ये दिलेल्या अधिकाराचा वापर करुन मा. राष्ट्रपतींनी यापूर्वी १९५० साली प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित क्षेत्रामध्ये बदल करण्याचे ठरविले व त्याप्रमाणे महाराष्ट्र राज्याचे आदिवासी उपयोजना क्षेत्र हे अनुसूचित क्षेत्राशी संतुलीत करण्यात आले. हे संतुलीत आदिवासी उपयोजना क्षेत्र शासनाने त्यांचे विधी व न्याय मंत्रालयाची असाधारण अधिसूचना दिनांक २ डिसेंबर, १९८५ भाग-२ खंड -३, उपखंड-१, क्रमांक ५२१ द्वारे महाराष्ट्रातील अनुसूचित क्षेत्र म्हणून घोषित केले.

३. केंद्र शासनाने वर नमूद केल्याप्रमाणे दिनांक २ डिसेंबर, १९८५ चे अधिसूचनेप्रमाणे घोषित केलेले क्षेत्र १९७१ च जनगणनेप्रमाणे समाविष्ट केलेल्या गावांच्या आधारावर होते. सन १९७१ ते १९८१ च्या दरम्यान महाराष्ट्रातील गावे व शहरांमध्ये बदल झाला आहे. सन १९८१ च्या जनगणनेमध्ये अनुसूचित क्षेत्रातील काही वाड्यांचे /पाड्यांचे गावात रुपांतर करण्यात आले. त्यामुळे असे आढळून आले की नवीन झालेल्या गावांना अनुसूचित क्षेत्रातील योजनांपासून वंचित व्हावे लागेल. अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील नवीन घोषित झालेल्या गावानाही या योजनेचा फायदा मिळावा म्हणून अनुसूचित क्षेत्रातील गावांची सुधारीत यादीची गरज भासू लागली. त्यानुसार १९८१ चे जनगणनेत नव्याने निर्माण झालेल्या गावांचा विचार करुन अनुसूचित क्षेत्राची सुधारीत यादी तयार करण्यात आली. तसेच अतिरिक्त उपयोजना क्षेत्रातील काही गावे व सुधारीत क्षेत्र विकास आराखड्यातील काही गावे अनुसूचित क्षेत्रात घेतल्यामुळे ती अतिरिक्त उपयोजना क्षेत्रातून व सुधारीत क्षेत्र विकास आराखड्यातून वगळली गेली. त्यामुळे उपयोजना क्षेत्रामध्ये बराच बदल झाला.

४. महाराष्ट्रातील पूर्वी जाहीर केलेल्या आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात बदल करणे आवश्यक झाल्याने यासंबंधीचे यापूर्वीचे सर्व आदेश रद्द केले आहेत. तसेच या शासन निर्णयान्वये महाराष्ट्रातील रायगड, ठाणे, नाशिक, धुळे, जळगाव, अहमदनगर, पुणे, नांदेड, अमरावती, यवतमाळ, नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली या १४ जिल्ह्यातील ६८ तालुक्यांमधून ६३६२ गावे व १३ शहरे आदिवासी उपयोजना क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात येत आहे. या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील एकूण ६३६२ गावे व १३ शहरांपैकी ५३११ गावे व १२ शहरे ही मुख्य आदिवासी उपयोजना क्षेत्रात ( अनुसूचित क्षेत्र १९८५) तसेच १०५१ ही गावे ही अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात समाविष्ट करण्यात येत आहेत. मुख्य आदिवासी उपयोजना क्षेत्र (अनुसूचित क्षेत्र) व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्र यामध्ये समाविष्ट असणा-या गावांची यादी अनुक्रमे विवरणपत्र "अ" व विवरणपत्र "ब" मध्ये दर्शविलेली आहे. सर्व संबंधितांनी यापुढे आदिवासी विकासाच्या योजना आखतांना व त्या राबवितांना वरील प्रमाणे आदिवासी उपयोजना क्षेत्र समजावे.

५. हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( क. या. जहार )
उप सचिव
महाराष्ट्र शासन,
आदिवासी विकास विभाग

ii

## GADCHIROLI DISTRICT

Following Tahsils are fully covered in Scheduled Area.

1) Sironcha
2) Aheri
3) Ettapalli
4) Dhanora
5) Kurkheda

Following Tahsils are partly covered in Scheduled Area (1985)

1) Gachiroli
2) Armori
3) Chamorshi

The List of villages included in the Tahsils partly covered are appended.

**Statement Showing the names of villages included in the scheduled area (1985) (Main Tribal Sub plan area) The Names and their corresponding Census Code Numbers are as per the 1981 Census**

| DISTRICT : GADCHIROLI | | | TAHSIL : GADCHIROLI | | |
|---|---|---|---|---|---|
| S.N. | Census Code No.1981 | Name of the Village/ town | S.N. | Census Code No.1981 | Name of the Village/ town |
| 1 | 517 | Navargaon | 34 | 678 | Sakhera |
| 2 | 520 | Chak Maushi | 35 | 679 | Ravanzora |
| 3 | 521 | Nurwadi | 36 | 680 | Pekinkasa |
| 4 | 550 | Khursa | 37 | 681 | Sawelda |
| 5 | 551 | Palandur | 38 | 682 | Saimera |
| 6 | 552 | Gilgaon | 39 | 684 | Keligatta |
| 7 | 553 | Botheda | 40 | 716 | Tahagaon |
| 8 | 554 | Murumbodi | 41 | 717 | Kanhalgaon |
| 9 | 559 | Jepra | 42 | 718 | Salaitola |
| 10 | 563 | Chak-Churchura | 43 | 719 | Karkazora |
| 11 | 564 | Kurhadi | 44 | 720 | Gajangada |
| 12 | 571 | Visapur | 45 | 751 | Bitentola |
| 13 | 572 | Sonapur | 46 | 752 | Devapur |
| 14 | 574 | Kharpudi Chak | 47 | 753 | Benoli |
| 15 | 577 | Chak Dibhana | 48 | 754 | Suryadongari |
| 16 | 583 | Kurkheda | 49 | 755 | Rangad |
| 17 | 584 | Savargaon | 50 | 756 | Potegaon |
| 18 | 605 | Ranbhumi | 51 | 757 | Gawalheti |
| 19 | 606 | Ramal | 52 | 758 | Dewada |
| 20 | 607 | Chandala | 53 | 759 | Taduda |
| 21 | 608 | Mendha | 54 | 760 | Rajoli |
| 22 | 618 | Kaneri | 55 | 761 | Marada |
| 23 | 619 | Pulkal | 56 | 762 | Jaller |
| 24 | 620 | Mudza Bakum | 57 | 772 | Nagweli |
| 25 | 621 | Mudza Tukum | 58 | 773 | Korkiti Masahat |
| 26 | 623 | Krupala | 59 | 774 | Jamgaon |
| 27 | 624 | Mhasali | 60 | 775 | Jalegaon |
| 28 | 628 | Kumbhi Chak | 61 | 776 | Kodsi |
| 29 | 629 | Kumbhi Mokasa | 62 | 777 | Kharadguda |
| 30 | 630 | Medemal | | | |
| 31 | 660 | Raipur | | | |
| 32 | 662 | Kosamghat | | | |
| 33 | 663 | Maroda | | | |

| DISTRICT :GADCHIROLI | | | TAHSIL : ARMORI | | |
|---|---|---|---|---|---|
| S.N. | Census Code No.1981 | Name of the Village/ town | S.N. | Census Code No.1981 | Name of the Village/ town |
| 1 | 107 | Kasarigaon | 36 | 376 | Thodebodi |
| 2 | 108 | Kasari Takum | 37 | 377 | Dongartamasi Patch |
| 3 | 113 | Koregaon | 38 | 379 | Dongar tamasi |
| 4 | 120 | Kalamgaon | 39 | 380 | Mendha |
| 5 | 122 | Salda Lamp | 40 | 381 | Hirapur |
| 6 | 156 | Pimpalgaon | 41 | 383 | Chak Sonpur |
| 7 | 157 | Salda Takum | 42 | 384 | Chak Karpada Ryt |
| 8 | 161 | Kurul | 43 | 389 | Thanegaon |
| 9 | 164 | Shivarjpur | 44 | 392 | Deulgaon |
| 10 | 167 | Potegaon | 45 | 398 | Lohara |
| 11 | 169 | Vihirgaon | 46 | 399 | Motatola @ Kukdi |
| 12 | 251 | Donghargaon (Halbi) | 47 | 400 | Chek Naroti |
| 13 | 252 | Arattondi | 48 | 401 | Wadegaon |
| 14 | 260 | Palasgaon | 49 | 402 | Chak Kurandi |
| 15 | 261 | Navargaon | 50 | 403 | Kurandi |
| 16 | 306 | Chavala | 51 | 404 | Umari |
| 17 | 311 | Puran Vairagad | 52 | 405 | Yengada |
| 18 | 315 | Mangewada | 53 | 406 | Pisewadadha |
| 19 | 316 | Pathargota | 54 | 407 | Paraswadi |
| 20 | 325 | Armori | 55 | 408 | Jambhali |
| 21 | 327 | Salmera | 56 | 409 | Bhansi |
| 22 | 328 | Patanwala | 57 | 410 | Mendha |
| 23 | 333 | Sukala | 58 | 448 | Kharadi |
| 24 | 331 | Mohazari alias Sukurbadi | 59 | 449 | Wakhanda |
| 25 | 332 | Shivani Kh. | 60 | 451 | Wanarchuwa |
| 26 | 333 | Nagarwahi | 61 | 452 | Narchuli |
| 27 | 334 | Kosari | 62 | 453 | Koregaon Rangi |
| 28 | 335 | Mangada | 63 | 454 | Vihirgaon |
| 29 | 336 | Tultuli | 64 | 455 | Naroti Malgujar |
| 30 | 370 | Bhakarandi | 65 | 456 | Dorli |
| 31 | 371 | Khadaki | 66 | 470 | Khairi |
| 32 | 372 | Dawndi | 67 | 471 | Chak Maregaon |
| 33 | 373 | Marpur | 68 | 472 | Chak Chincholi |
| 34 | 374 | Delanwadi | 69 | 473 | Chincholi |
| 35 | 375 | Chak Nagarwahi | 70 | 499 | Wakhenda |

| S.N. | Census Code No.1981 | Name of the Village/ town | S.N. | Census Code No.1981 | Name of the Village/ town |
|---|---|---|---|---|---|
| 71 | 500 | Belgaon | | | |
| 72 | 501 | Mausi Khambi | | | |
| 73 | 502 | Maregaon | | | |
| 74 | 503 | Maregaon Patch | | | |

********

| DISTRICT :GADCHIROLI | | | TAHSIL : CHAMORSHI | | |
|---|---|---|---|---|---|
| S.N. | Census Code No.1981 | Name of the Village/ town | S.N. | Census Code No.1981 | Name of the Village/ town |
| 1 | 677 | Bhandana | 25 | 798 | Kalamgaon |
| 2 | 721 | Khatari | 26 | 803 | Sonpur |
| 3 | 722 | Bhendi Kanh-her | 27 | 804 | Darli |
| 4 | 723 | Gilgaon | 28 | 806 | Rajangatta |
| 5 | 738 | Machamgaon | 29 | 808 | Chak Amgaon |
| 6 | 739 | Kural | 30 | 809 | Jangam Kurul |
| 7 | 742 | Chek Visapur | 31 | 810 | Manger |
| 8 | 743 | Bhadbhidi | 32 | 811 | Fusur |
| 9 | 745 | Joganna | 33 | 812 | Dhekani |
| 10 | 746 | Maler Jamindari | 34 | 813 | Chinchpali |
| 11 | 747 | Murmari | 35 | 814 | Bhavanchuwa |
| 12 | 748 | Ravanpali | 36 | 815 | Kothari |
| 13 | 749 | Kulgaon | 37 | 819 | Haladvahi |
| 14 | 750 | Chite Kanher | 38 | 821 | Bhadbhidi |
| 15 | 778 | Bengudaranda | 39 | 822 | Rajur Bk |
| 16 | 779 | Pavi Muranga | 40 | 825 | Chak Naranyanpur No.2 |
| 17 | 780 | Yedanur | 41 | 826 | Karakpalli Chak |
| 18 | 781 | Ambapur | 42 | 840 | Adyal |
| 19 | 782 | Pavi Lasanpeth | 43 | 842 | Gahubodi |
| 20 | 783 | Mathur | 44 | 845 | Karagpali |
| 21 | 784 | Pandhari Bhatal | 45 | 846 | Narayanpur |
| 22 | 785 | Rekhagaon | 46 | 847 | Chak Naranyanpur No.1 |
| 23 | 787 | Walsara | 47 | 848 | Belgatta |
| 24 | 793 | Saganpur | 48 | 849 | Pettala |

| S.N. | Census Code No.1981 | Name of the Village/ town | S.N. | Census Code No.1981 | Name of the Village/ town |
|---|---|---|---|---|---|
| 49 | 850 | Rajur Kh | 84 | 912 | Bolepalli |
| 50 | 851 | Pettala Chak | 85 | 914 | Gatta |
| 51 | 853 | Belka Bulgatta | 86 | 920 | Tumadi |
| 52 | 855 | Manjgaon | 87 | 925 | Raipur |
| 53 | 856 | Machhlighot | 88 | 940 | Ambela |
| 54 | 859 | Chak Makepalli No.4 | 89 | 943 | Morkhandi(Bolkhandi) |
| 55 | 860 | Chak Makepalli No.3 | 90 | 945 | Bhandupalli |
| 56 | 861 | Chak Made Amgaon | 91 | 947 | Basarwada |
| 57 | 862 | Garanji | 92 | 949 | Kolaspur |
| 58 | 863 | Makepalli | 93 | 950 | Gangapur |
| 59 | 865 | Chak made Amgoan No.2 | 94 | 953 | Lohara |
| 60 | 866 | Chak made Amgoan No.1 | 95 | 954 | Rengawahi |
| 61 | 870 | Chak make palli no.2 | 96 | 955 | Bramhanpeth |
| 62 | 873 | Darpanguda | 97 | 956 | Aheti Nokewada |
| 63 | 877 | Singela | 98 | 958 | Borghat |
| 64 | 878 | Metguda | 99 | 959 | Nokewada |
| 65 | 881 | Waigaon | 100 | 961 | Alapalli |
| 66 | 882 | Saganpur | 101 | 963 | Yellur |
| 67 | 886 | Ambori | 102 | 964 | Thakari |
| 68 | 890 | Laxamanpur | 103 | 965 | Rajgatta |
| 69 | 891 | Mudholi | 104 | 966 | Kunghada |
| 70 | 894 | Bamnideo | 105 | 967 | Chapparla |
| 71 | 895 | Jairampur | 106 | 968 | Chaidampalli |
| 72 | 896 | Pardideo | 107 | 969 | Chandankheda |
| 73 | 897 | Yadavpalli | 108 | 970 | Dhanur |
| 74 | 898 | Chak Mudholi No.2 | 109 | 971 | Malera |
| 75 | 899 | Somanpalli | 110 | 977 | Mukari |
| 76 | 901 | Kanhalgaon | 111 | 978 | Mukaritola |
| 77 | 903 | Jambela | 112 | 986 | Gomani |
| 78 | 906 | Rengandi | 113 | 987 | Fuski |
| 79 | 907 | Vengandi | 114 | 990 | Ambatpalli |
| 80 | 908 | Surgaon | 115 | 991 | Chichela |
| 81 | 909 | Palligundam | 116 | 992 | Kodigaon |
| 82 | 910 | Adagepalli | 117 | 993 | Kothari |
| 83 | 911 | Hetalkada | 118 | 994 | Lagam Chak |

| N. | Census Code No.1981 | Name of the Village/ town | S.N. | Census Code No.1981 | Name of the Village/ town |
|---|---|---|---|---|---|
| 19 | 996 | Singanpalli | 126 | 1,006 | Tumarguuda |
| 20 | 997 | Nagulwah | 127 | 1,007 | Dampur |
| 21 | 998 | Machigatta | 128 | 1,009 | Chatguntha |
| 22 | 999 | Lagambetti | 129 | 1,010 | Yella |
| 23 | 1,002 | Kolpalli | 130 | 1,011 | Tikepalli |
| 24 | 1,004 | Marpalli | 131 | 1,014 | Kabhe |
| 25 | 1,005 | Jamgaon | 132 | 1,015 | Rampur |

**********